महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनांना अनुदान वितरीत <u>करण्याबाबत.</u>
बार्शी नगर परिषद, जि. सोलापूर

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुनिअ-२०१४/प्र.क्र.११० /पापु.२२
गोकुळदास तेजपाल हॉस्पिटल संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: १७ जानेवारी, २०१८

<u>वाचा :-</u>
१. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. नापापु-२००८/प्र.क्र.१/पापु-२२,दि. २२.१०.२००८
२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.नापापु-२००८/प्र.क्र.१९८/पापु-२२, दि.२३.१२.२००८
३. मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, पुणे यांचे पत्र क्र. मु.अ. (प्र.व्य.स.से.)/ तांशा-४/प्र.क्र.१३४/५५, दि.११.१.२०१४
४. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र- सुनिअ २०१४/प्र.क्र.४८/पापु-२२, दिनांक १३.२.२०१४
५. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र- सुनिअ २०१४/प्र.क्र.११०/पापु-२२, दिनांक २२.५.२०१४
६. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र- सुनिअ २०१४/प्र.क्र.११०/पापु-२२, दिनांक ९.१.२०१५
७. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र- सुनिअ २०१४/प्र.क्र.११०/पापु-२२, दिनांक १.३.२०१६
८. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र- सुनिअ २०१४/प्र.क्र.४८/पापु-२२, दिनांक १.६.२०१६

<u>प्रस्तावना :-</u>

शासन निर्णय, दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ अन्वये नागरी पाणीपुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात पर्याप्त, गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करुन महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व नागरीकांना पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या सर्वव्यापक सुविधा निश्चितपणे उपलब्ध करुन देणे हा महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

२. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दिनांक १३.२.२०१४ अन्वये बार्शी शहर पाणी पुरवठा योजनेच्या एकूण रु. ५३२९.५९ लक्ष इतक्या भांडवली कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, पुणे यांनी सदर योजनेतील एकूण रुपये ४९,८०,९२,७२०/- इतक्या निव्वळ किंमतीच्या भांडवली कामांस तांत्रिक मंजूरी दिली आहे. सदर योजनेकरीता बार्शी नगर परिषदेकडून “प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार” (P.M.C.) म्हणून कोणाचीही नेमणूक करण्यात आली नसल्याने शासन निर्णय, दिनांक १.६.२०१६ अन्वये बार्शी शहर पाणी पुरवठा योजनेच्या एकूण किंमतीमधून “प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार” याकरीता शासन निर्णय, दिनांक १३.२.२०१४ अन्वये मंजूर ५% रक्कम

रुपये २,४९,०४,६३६/- कमी करुन सदर योजनेतील भांडवली कामांच्या एकूण रु.५०,८०,५४,५७४/- किंमतीच्या प्रस्तावास सुधारीत मान्यता देण्यात आली आहे. बार्शी नगर परिषदेने कर्ज व स्वहिश्श्यापोटी बँक खात्यामध्ये जमा केलेल्या रकमेच्या प्रमाणात संदर्भ क्र. ५, ६ व ७ अन्वये सदर योजनेस अनुज्ञेय अनुदानापैकी एकूण रुपये २६३९.२० लक्ष अनुदान बार्शी नगर परिषदेस वितरीत करण्यात आले आहे. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद यांनी एकूण रुपये ३७४०.२० लक्ष रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच सदर योजनेचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करुन घेण्यात आलेल्या "थर्ड पार्टी ऑडीट" ची प्रत सादर केली आहे. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद यांनी सदर योजनेतील मंजूर भांडवली कामे ७०.७९% पुर्ण झाली असल्याबाबतचा भौतिक प्रगती अहवाल सादर केला असुन बार्शी नगरपरिषदेने कर्ज व स्वहिश्श्यापोटी बँक खात्यामध्ये जमा केलेल्या एकूण रु.९९८.२० लक्ष निधीच्या प्रमाणात उर्वरित अनुदान वितरीत करण्याची विनंती केली आहे. शासन निर्णय, दिनांक १.६.२०१६ प्रमाणे सदर योजनेची एकूण किंमत ५०,८०,५४,५७४/- असुन, अनुज्ञेय अनुदान (८०%) रु.४०,६४,४३,६५९/- आहे. तसेच बार्शी नगर परिषदेने कर्जापोटी तसेच स्वहिश्श्यापोटी उभारावयाची (२०%) रक्कम रु.१०,१६,१०,९१५/- आहे. त्यापैकी बार्शी नगर परिषदेने रु.९९८.२० लक्ष रक्कम संबंधित बँक खात्यामध्ये जमा केली असल्याने, जमा केलेल्या रकमेच्या प्रमाणात रु. ३९,९२,७९,९९९/- इतके अनुदान बार्शी नगर परिषदेस देय ठरते. सदर देय रकमेतून यापूर्वी वितरीत करण्यात आलेले अनुदान रुपये २६३९.२० लक्ष वजा जाता सदर योजनेस रुपये १३,५३,५९,९९९/- अनुदान वितरीत करणे शिल्लक आहे. सदर योजनेची एकूण कामे ७०.७९% पुर्ण झाली असल्याने वितरीत करावयाच्या शिल्लक अनुदानातून सदर योजनेस अनुज्ञेय असलेल्या अनुदानापैकी १०% अनुदान रु. ४,०६,४४,३६५/- राखून ठेवून उर्वरित रुपये ९,४७,१५,६३४/- अनुदान बार्शी नगर परिषदेस वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत शासन निर्णय, दि.१३.२.२०१४ तसेच शासन निर्णय दि.१.६.२०१६ (सुधारीत) अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या बार्शी शहर पाणी पुरवठा योजनेच्या भांडवली कामांकरीता अनुज्ञेय अनुदानापैकी रुपये ९,४७,१५,६३४/- (रुपये नऊ कोटी सत्तेचाळीस लाख पंधरा हजार सहाशे चौतीस फक्त) इतके अनुदान पुढील विवरणानुसार वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम लाखांत)

शहराचे नांव	योजनेची एकूण किंमत	शासनाकडून अनुज्ञेय अनुदान (८०%)	नागरी स्व. संस्थेने भरावयाची स्वहिश्श्याची रक्कम (१०%)	ना.स्व.संस्थेने उभारावयाची कर्ज हिश्श्याची रक्कम (१०%)	नागरी संस्थेने भरलेली रक्कम	यापुर्वी वितरीत करण्यात आलेले अनुदान	याद्वारे वितरीत करावयाचे अनुदान
१	२	३	४	५	६	७	८
बार्शी, जि.सोलापूर	५०८०.५४	४०६४.४४	५०८.०५	५०८.०५	९९८.२०	२६३९.२०	९४७.१५
						एकूण	९४७.१५

२. सदर योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुज्ञेय होणाऱ्या सदर अनुदानावरील खर्च मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा १९२, स्थानिक संस्था, नगर पालिका इत्यादींना सहाय्य - राज्य योजना - (०२) (०२) नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनि:स्सारण योजनांसाठी सहायक अनुदान (२२१५ १६४७), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर लेखाशिर्षाखाली शासनाकडून उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून उक्त विवरणपत्रातील नमूद स्तंभ क्रमांक ८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान वितरीत करावे, तसेच अनुदानाच्या या वितरणाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

३. संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने योजनेसाठी स्वतंत्र लेखे ठेवावेत आणि योजनेचा प्रगती अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्रे नियमितपणे वेळोवेळी शासनास सादर करावी.

४. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत शासकीय अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत नागरी संस्थानी शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक- नापापु २००८/प्र.क्र.१/पापु-२२ दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ मधील तरतूदीचा अवलंब करणे आवश्यक राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११७११०९२७६१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Jairam Tumram

Digitally signed by Sunil Jairam Tumram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873e6409c70b0a0219d717dd6767c9aec9dd2d61ecf0cc982e9e93ef57312675, cn=Sunil Jairam Tumram
Date: 2018.01.17 12:54:59 +05'30'

(सु.ज. तुमराम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- मा.मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

- महालेखापाल १ -मुंबई/नागपूर.
- संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
- विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
- जिल्हाधिकारी, सोलापूर
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे.
- संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- मुख्याधिकारी, बार्शी नगर परिषद, जि.सोलापूर
- जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर
- जिल्हा प्रकल्प अधिकारी, (नगरपालिका) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
- वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- कक्ष अधिकारी, पापु.०४,पापु.२०,पापु.२१, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- निवडनस्ती, पापु-२२.